वर्ष ८ वे

अंक ४ था

सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण

**विद्यार्थी वसतिगृह भूमीपुजन समारंभ, वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व गुणवंत गौरव कार्यक्रम**

-: कार्यक्रमाचे स्थळ :-)

**लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, डांगे चौक (गुजर नगर), थेरगाव, पुणे ४११०३३**

**रविवार दि. १०.०८.२००८ रोजी सायं. ४.३० वा. (मो.९२७००३१४८१)**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

**(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)**

**यांचे मुखपत्र**

# संवाद

**(त्रैमासिक)**

**जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २००८**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- बांधकामाचा एकूण अपेक्षित खर्च रु.८० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०' X १४'
- एकूण १२० विद्यार्थ्यांची सोय.

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु.५ लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु.६१,००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु.५००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

ए-१/१, यशोधन सोसायटी, चिंतामणीनगर भाग-२. बिबवेवाडी, पुणे - ३७.

## विद्यार्थी वसतिगृह भूमीपुजन समारंभ, स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व गुणवंत गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा विद्यार्थी वसतिगृह भूमीपुजन समारंभ, वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व गुणवंत व्यक्तींचा गौरव समारंभ **रविवार दि.१० ऑगस्ट २००८** रोजी **सायं. ४.३० वा. लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, डांगे चौक (गुजर नगर), थेरगाव, पुणे ४११०३३** येथे आयोजित केलेला आहे.

**❊ अध्यक्ष ❊**

**मा.ना.अजितदादा पवार**

जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री, पुणे जिल्हा

**❊ प्रमुख पाहुणे ❊**

**मा.ना.दिलीप वळसे पाटील**

उच्चतंत्र शिक्षण व उर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री अहमदनगर जिल्हा

**मा.आ.विलास लांडे**
हवेली तालुका

**मा.आ.लक्ष्मण जगताप**
विधान परिषद सदस्य

**मा.श्रीरंग उर्फ आप्पा बारणे**
नगरसेवक, पिं.चिं.मनपा

**मा.आ.विजयराव औटी**
पारनेर तालुका

**मा.पोपटराव पवार**
सरपंच, बाजार हिवरे

या सन्माननीयांच्या उपस्थितीत होणार आहे.
तरी आपण यावेळी अगत्य उपस्थित रहावे, ही विनंती.

**❊ आपले नम्र ❊**

**हौसाराम विठ्ठलराव घोडके**
अध्यक्ष

**सखाराम कोंडिबा गागरे**
उपाध्यक्ष

**बाजीराव झुंजारराव जगदाळे**
सेक्रेटरी

**सुनील कुंडलीक पोटे**
सहसेक्रेटरी

**डॉ.बाळासाहेब बांडे**
कार्यवाहक

**मधुकर हौशाभाऊ शिरोळे**
सहकार्यवाहक

**सदस्य :- इंजि.विजयकुमार गोविंदराव ढुबे, अशोक विश्वनाथ वाबळे, भाऊसाहेब गंगाराम नरड, सुनील सूर्यभान कोल्हे, काशिनाथ बापूराव गायकवाड, रामदास सोनाजी शिर्के, साहेबराव गंगाधर मोरे, मुरलीधर पंढरीनाथ चौधरी, प्रा.अभिमान सोपानराव तराळ, रामदास गवराम पुजारी,**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक २५ जुलै २००८ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. १०.०८.२००८** रोजी **सायं. ५.३० वा. लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, डांगे चौक (गुजर नगर), थेरगाव, पुणे ४११०३३** येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.२९.०७.०७ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.
२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २००७-२००८ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३) सन २००९ ते २०१० साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
४) भावी कार्याची दिशा ठरविणे.
५) सन २००८ ते २००९ साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.
६) विद्यार्थी वसतिगृहाच्या बांधकामासाठी रु.५० लक्ष खर्चास मंजुरी देणे.
७) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-** १) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. २) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी सायं. ६.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल. ३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.०८.०८.२००८** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

**टीप :- सदर कार्यक्रमाच्या अगोदर मंडळाच्या विद्यार्थी वसतिगृहाचा भूमीपुजन समारंभ, विद्यार्थी पारितोषिक वितरण व गुणवंत व्यक्तींचा गौरव समारंभ होणार आहे.**

**कार्यक्रम संपल्यानंतर मंडळातर्फे भोजनाची व्यवस्था केलेली आहे.**

**❊ आपले नम्र ❊**

**हौसाराम विठ्ठलराव घोडके**
अध्यक्ष

**सखाराम कोंडिबा गागरे**
उपाध्यक्ष

**बाजीराव झुंजारराव जगदाळे**
सेक्रेटरी

**सुनील कुंडलीक पोटे**
सहसेक्रेटरी

**डॉ.बाळासाहेब बांडे**
कार्यवाहक

**मधुकर हौशाभाऊ शिरोळे**
सहकार्यवाहक

**सदस्य :- इंजि.विजयकुमार गोविंदराव ठुबे, अशोक विश्वनाथ वाबळे, भाऊसाहेब गंगाराम नरड, सुनील सूर्यभान कोल्हे, काशिनाथ बापूराव गायकवाड, रामदास सोनाजी शिर्के, साहेबराव गंगाधर मोरे, मुरलीधर पंढरीनाथ चौधरी, प्रा.अभिमान सोपानराव तराळ, रामदास गवराम पुजारी,**

## ❊ कार्यक्रमाचे स्थळ ❊

रविवार दि.१०.०८.०८ रोजी सा.५.३० वा. लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, डांगे चौक (गुजर नगर), थेरगाव, पुणे ३३.

**कार्यालय संपर्क मोबाईल नं. : ९२७००३१४८१**

# संपादकीय

प्रिय सभासद,

आज संपादकीय आपल्यापुढे सादर करताना मला प्रचंड आनंद होत आहे. आपल्यासहीत असंख्य कार्येकर्ते व हितचिंतक यांनी केलेल्या योगदानाचे खऱ्या अर्थाने चीज होण्याचा दिवस आता जवळ आला असून तो दिवस म्हणजे १० ऑगस्ट २००८. मागील अंकामध्ये मी आपल्याशी चर्चा केल्याप्रमाणे चिंचवड (थेरगाव) येथील स्वतःच्या मालकीच्या ५००० चौ.फुट जागेमध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी बांधावयाच्या वसतिगृहाचे भूमीपुजन करण्यासाठी शेवटी मुहूर्त मिळालाय ! पुणे व अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री महोदय यांच्या हस्ते दि.१० ऑगस्ट २००८ रोजी आपल्या वसतिगृहाचे बांधकाम सुरु होत आहे. अत्यंत कार्यक्षम अशा व्यक्तिच्यांच हस्ते बांधकामाची सुरुवात होत आहे ही एक आनंददायी बाब आहे. या यशस्वी आयोजनाचे श्रेय जाते ते मित्र मंडळाच्या कार्यकारिणीला. या कार्यकारिणी रुपी रेल्वेचे इंजिन आहे शिवश्री हौसाराम घोडके.

शिवश्री हौसाराम घोडके यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने आतापर्यंत रु.३५ लक्ष निधी गोळा केला असून अधिक निधी गोळा करण्यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत. या पहिल्या टप्प्यातील बांधकामाचा अपेक्षित खर्च रु.५० लक्ष असून पहिल्या टप्प्यामध्ये पहिल्या दोन मजल्याचे बांधकाम फक्त सहा महिन्यामध्येच पूर्ण करण्याचे मंडळाचे नियोजन आहे.

बांधकाम करण्यासाठी संकल्पचित्र अभियंता, वास्तुशास्त्रज्ञ, स्थापत्य अभियंता तसेच मी स्वतःही योगदान देत आहोत. योगदान देणाऱ्या सर्व व्यक्ती आपल्याच तालुक्यातील असल्याने बांधकाम चांगल्या दर्जाचे व्हावे म्हणून सर्वजण मनापासून विनामूल्य सेवा देत आहेत. त्याबद्दल मी सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो व सर्व सभासदांच्या वतीने त्यांना धन्यवाद देतो.

मागील अंकामध्ये आवाहन केल्याप्रमाणे तसेच मंडळाचे अध्यक्ष श्री. हौसाराम घोडके यांनी प्रयत्न केल्यामुळे बऱ्याच मंडळींनी समाधानी वृत्तीने व मोकळ्या मनाने मंडळास बांधकामासाठी देणगी दिली आहे. त्यातील काही मान्यवरांचा परिचय याच अंकात स्वतंत्रपणे दिला आहे. या सर्व देणगीदारांच्या प्रती मी ऋण व्यक्त करतो.

मंडळ ज्या पद्धतीने काम करीत आहे, त्यावरून डिसेंबर २००८ अखेर वसतिगृहाची इमारत पूर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त करतो. आपणास सांगण्यासही मला आनंद वाटतो की, या मंडळाकडून प्रेरणा घेवून नाशिक येथे सुद्धा शिवश्री हसन मुजावर या कान्हूर-पठार वासीय अभियंत्याने 'पारनेर तालुका मित्र मंडळ नाशिक' ची स्थापना केली आहे. शिवश्री मुजावर यांचे अभिनंदन!

हा अंक मोठा झाल्याने जास्त लांबवणे योग्य होणार नाही. मंडळाने वसतिगृहाचे फार मोठे शिवधनुष्य उचलले असून ते तोलण्यासाठी आपल्या सर्वांच्या तन, मन व धनाची गरज आहे. ती गरज पूर्ण होण्यासाठी जिजाऊ आपणा सर्वांना प्रेरणा देवो ही अपेक्षा ठेवून येथेच थांबतो.

जय जिजाऊ। जय शिवराय।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक


## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० | श्री.रामदास पुजारी | सदस्य | ९३२५५१८६३० |
| श्री.सखाराम गागरे | उपाध्यक्ष | ९७३००७५०३३ | प्रा.अभिमान तराळ | सदस्य | ९७६६१४८९०२ |
| श्री.बाजीराव जगदाळे | सेक्रेटरी | ९९२२३७४२२५ | श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६४७२५८११ |
| श्री.सुनील पोटे | सहसेक्रेटरी | ९२२६९२१०८८ | श्री.साहेबराव मोरे | सदस्य | ९८२२०६४६९९ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | कार्यवाहक | ९८२२०५१५९३ | श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.मधुकर शिरोळे | सहकार्यवाहक | ९९२२१६६१२५ | श्री.काशिनाथ गायकवाड | सदस्य | ९४२२०१७९४० |
| श्री.रामदास शिर्के | अंतर्गत लेखा परिक्षक | ९४२२०१६७६४ | श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| इंजि.विजयकुमार ठुबे | सदस्य | ९४२२०२६२२५ | श्री.अशोक वाबळे | सदस्य | ९८८१६०८३५७ |


# रु.५००००/- पेक्षा जास्त देणगी देणाऱ्या व्यक्तिंचा गौरव


हौसाराम घोडके

❇ पारनेर तालुका मित्र मंडळाचे अध्यक्ष श्री.हौसाराम विठ्ठलराव घोडके यांनी एकूण देणगी रु.१,०३,०००/- (रुपये एक लक्ष तीन हजार) दिली आहे.


बाळासाहेब मातेरे


❇ श्री.विष्णू उर्फ बाळासाहेब महादेव मातेरे रा.बाभुळवाडे यांनी एकूण देणगी रु.७२,०००/- (रुपये बहात्तर हजार) देणगी दिली.


शिवाजी बांडे

❇ प्राचार्य श्री.शिवाजी राघूजी बांडे रा.टाकळी ढोकेश्वर यांची एकूण देणगी रु.६६०००/- (रुपये सहासष्ट हजार) दिली आहे.


प्रदीप ढोकरे

❇ श्री. प्रदीप धोंडीबा ढोकरे रा. कोठे ता. संगमनेर जि. अहमदनगर यांनी एकूण देणगी रु.६२,०००/- (रुपये बासष्ट हजार) दिली आहे.


सुनील बोकरिया

❇ श्री.सुनील शांतीलाल बोकरिया रा.कान्हूर पठार यांनी एकूण देणगी रु.६१०००/- (रुपये एकसष्ट हजार) दिली आहे.


कमलाबाई कर्नावट

❇ श्रीमती कमलाबाई भागचंद कर्नावट रा.खडकवाडी यांनी एकूण देणगी रु. ६१०००/- (रुपये एकसष्ट हजार) देणगी दिली.


डॉ.बाळासाहेब बांडे

❇ डॉ. बाळासाहेब दगडू बांडे रा. टाकळी ढोकेश्वर यांनी एकूण देणगी रु.६०,०००/- (रुपये साठ हजार) दिली आहे.


सलीम पठाण

❇ श्री.सलीम हसन पठाण रा. ढोकी हे विद्यार्थी वसतिगृह बांधकामासाठी रु.६५,०००/- (रुपये पासष्ट हजार) च्या बांधकाम साहित्याची (वाळू) देणगी देत आहेत.

# आपण असे केले तर...

❇ श्री.पोपटराव केशवराव थोरात रा.पाडळी आळे यांनी त्यांचे चुलते कै.यशवंतराव गणपतराव थोरात यांचे स्मरणार्थ मंडळास रु.२०११/- देणगी दिली.

❇ श्री.भास्कर पाटीलबुवा खोडदे रा.किन्ही यांनी त्यांच्या मातोश्री कै.अनुसयाबाई यांचे स्मरणार्थ मंडळास रु.१००१/- देणगी दिली.

❇ श्री.दिनकर विठ्ठलराव घोडके रा.पारनेर यांनी त्यांचे सुपुत्र चि.यशवंत यांचे शुभविवाहानिमित्त मंडळास रु.१०००/- देणगी दिली.

❇ श्री.अशोक बन्सीलालजी गांधी रा.सुपे यांनी त्यांचे सुपुत्र चि.प्रशांत याच्या दि.६.५.२००८ रोजीच्या वाढदिवसानिमित्त मंडळास रु.५००/- देणगी दिली.

❇ श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे रा. बाभुळवाडे यांनी त्यांची सुकन्या सौ.शितल हिचे शुभविवाहानिमित्त मंडळास रु.१०००/- देणगी दिली.

❇ प्रा.राजाराम नानाभाऊ पागिरे व सौ.मंगला राजाराम पागिरे रा.पिंपरी पठार यांनी त्यांच्या दि.११.५.२००८ रोजीच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त मंडळास रु.१०००/- देणगी दिली.

❇ श्री.प्रशांत रसिकलाल भळगट रा.कर्जुले हरेश्वर यांनी त्यांच्या आजी कै.सौ.गुलाबबाई हेमराज भळगट यांच्या दि.१०.०४.२००८ रोजीच्या चौथ्या स्मृती दिनानिमित्त मंडळास रु.१००१/- देणगी दिली.

❇ श्री.विठ्ठल उर्फ अशोक केशवराव वाबळे रा. घाणेगाव यांनी त्यांची कन्या कुमारी गिरीजा हिच्या दिनांक २४.६.२००८ रोजीच्या वाढदिवसानिमित्त मंडळास रु.२०००/- देणगी दिली.

❇ श्री.रामराव नारायण पाटील रा.सांगवी सूर्या हे सरदार दस्तूर होशंग बॉईज हायस्कूल मधून दि.३१.५.२००८ रोजी सेवानिवृत्त झाले त्यानिमित्त त्यांनी मंडळास रु.१००१/- देणगी दिली.

❇ श्री.गवराम महादू मोरे रा.वडझिरे यांनी त्यांचे सुपुत्र चि.मंगेश याचे शुभविवाहानिमित्त मंडळास रु.१०००/- देणगी दिली.

❇ सौ. बेबीताई बाजीराव जगदाळे रा. बाभुळवाडे यांनी त्यांचे पिताश्री कै.रामभाऊ सहादू बराटे रा.पुणे यांचे स्मरणार्थ मंडळास रु.१००१/- देणगी दिली.

❇ श्री.रामदास सोनाजी शिर्के रा.कर्जुले हरेश्वर यांनी त्यांचे ज्येष्ठ बंधू कै.हरिभाऊ सोनाजी शिर्के यांचे स्मरणार्थ मंडळास रु.१०००/- देणगी दिली.

# गुणवंत व्यक्तिंचा गौरव

- ❇ श्री. सावळेराम तुकाराम ठुबे माध्यमिक शिक्षक रा.कान्हूर पठार यांना शिक्षक दिन २००८ निमित्त आदर्श शिक्षक म्हणून **राष्ट्रपती पुरस्कार** जाहीर झाला आहे.
- ❇ श्री. भास्करराव भिकाजी शेळके रा. भोंद्रे यांची **सहकार सहआयुक्त** म्हणून पदोन्नती झाली.
- ❇ श्री. बाबासाहेब भाऊसाहेब साठे रा.हंगे यांची **पिंपरी चिंचवड सह. बँकेच्या अध्यक्षपदी** बिनविरोध निवड झाली.
- ❇ अॅड. पोपटराव भिकाजी सोबले रा.सोबलेवाडी यांची मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रियल अँड अॅग्रीकल्चर या ख्यातनाम संस्थेच्या कोअर कमिटी ऑफ कॉमर्स अँड फूड इंडस्ट्रिजवर **अॅडव्हायजर** फॉर फूड प्रोसेसिंग इंडस्ट्रीज या पदावर निवड झाली.
- ❇ प्रा.डॉ.अरुणा दत्तात्रय ठुबे रा. कान्हुर पठार या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे येथे प्राध्यापिका असून त्यांना **आय.आय.टी. रुरकी** या संस्थेने 'Optimal utilisation of water resources in transboundary Krishna river basin' या विषयावर **पी.एच.डी.** प्रदान केली आहे.



- ❇ श्री. संभाजी विठ्ठलराव देठे रा. बहिरोबावाडी, बांधकाम व्यवसाय, **सामाजिक कार्यात सक्रिय** सहभाग, दैनंदिन कामकाजातून अनेकांना मदत.
- ❇ श्री. संजय गेणू बागडे रा. हंगे हे आर्किटेक्ट असून त्यांच्या देखरेखीखाली मंडळाच्या वसतिगृहाचे काम होत असून त्यांनी मंडळास **विनामूल्य सेवा** दिली.
- ❇ श्री. विजय जगन्नाथ खिलारी ME (Structure) रा. टाकळी ढोकेश्वर यांनी मंडळाच्या वसतिगृहाचे आर.सी.सी.डिझाईन **विनामूल्य** केले.
- ❇ सौ. सुजाता विजयकुमार ठुबे (Civil Engineer) रा. कान्हूर पठार यांनी मंडळाच्या वसतिगृहाचे सुपरव्हिजन **विनामूल्य** करण्याचे मान्य केले आहे.
- ❇ इंजि.सुनील कदम, पुणे यांनी मंडळाच्या वसतिगृहाचे सुपरव्हिजन **विनामूल्य** करण्याचे मान्य केले आहे.
- ❇ श्री. बाळासाहेब गोविंदराव शिंदे रा. पिंपरी पठार यांची संरक्षण खात्यामध्ये **प्रिन्सीपल चीफ सायंटिफीक अधिकारी** म्हणून पदोन्नती झाली आहे.
- ❇ श्री. राजेंद्र कचरदास घावटे, वरिष्ठ व्यवस्थापक, स्पॅको इंडिया लि. पुणे, रा. जवळे हे शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक कार्यक्रमातून गेली अनेक वर्षे समाज प्रबोधन करीत आहेत.
- ❇ श्री. गौतम सखाराम देशमुख रा. पळवे यांची टाटा मोटर्स एम्प्लॉईज युनियनच्या **कार्यकारिणीवर** दुसऱ्यांदा निवड झाली.
- ❇ श्री. गंगाधर विठ्ठल मांडगे रा. गवळी पिंपरी यांची टाटा मोटर्स एम्प्लॉईज युनियनच्या **कार्यकारिणीवर** दुसऱ्यांदा निवड झाली.
- ❇ श्री. अनंत महादेव मातेरे रा. बाभुळवाडे व्यवसाय सांभाळून **सामाजिक कामात भाग** व मंडळाच्या निधी संकलनामध्ये सिंहाचा वाटा
- ❇ सौ. बबई कुंडलीक पोटे रा. बाभुळवाडे यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे दि.५.९.२००७ रोजी **आदर्श शिक्षिका** पुरस्कार मिळाला.
- ❇ सौ. रेखा प्रशांत मातेरे रा.बाभुळवाडे यांनी प्रपंच सांभाळून **सी.ए.** केले.


# गुणवंत विद्यार्थी गौरव

## कला - क्रीडा

- ❇ कुमार विपुल मारुती जगताप रा. पाडळी आळे इयत्ता ३ री यास महाराष्ट्र राज्य २० वी **किक बॉक्सींग** चॅम्पीयनशिप २००७ या स्पर्धेत सुवर्ण पदक मिळाले.



- ❇ कु.सलोनी सुमंत घोडके रा. पारनेर हीस 'Rising Star Open Tennis Tournament' मध्ये दहा वर्षाखालील मुलींच्या गटात **सुवर्णपदक** मिळाले. तसेच बोट क्लबद्वारे आयोजित स्पर्धेत सुद्धा तिला विजेतेपद मिळाले.



- ❇ कु. सुप्रभा रामदास पुजारी रा. पारनेर हीस 'Rising Star Open Tennis Tournament' मध्ये बारा वर्षाखालील मुलींच्या गटात **उपविजेतेपद** मिळाले. तिने चार निरनिराळ्या स्पर्धांमध्ये उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली आहे.



- ❇ कु. अनुजा ज्ञानदेव बोरुडे रा. करंदी आठव्या वर्षापासून पखवाज वादनाचे वेड व त्यात प्राविण्य. पखवाज वादनात **अलंकार** ही पदवी मिळविण्याचे ध्येय.

## प्राथमिक शिष्यवृत्ती

- ❇ कुमारी शिवांजली राणासिंह नवले रा. नवलेवाडी ही महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शहर विभागात ४थी आली. तिला २०० पैकी १९४ गुण मिळाले.

## दहावी

❇ कुमारी नेहा मधुकर शिंदे रा. बाबुर्डी हीस ९३.५% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी मयुरी विठ्ठलराव दहिवळ रा. पिंपरी जलसेन हीस ९२.५% गुण प्राप्त झाले.

❇ कुमार अमित वसंतराव पंदरकर यास ९१% गुण प्राप्त झाले.

❇ कुमार विक्रम मुरलीधर जगदाळे रा. बाभुळवाडे यास ९१% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी पल्लवी नानासाहेब खोडदे रा. किन्ही हिस ९१% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी स्नेहल भाऊसाहेब एरंडे रा.वडझिरे हीस ९१% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी पुजा प्रदीप शिंगवी रा.पारनेर हीस ९०% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी गायत्री संजय बागडे रा. हंगे हीस ९०% गुण प्राप्त झाले.

❇ कुमार अक्षय ज्ञानेश्वर पोटघन रा.जातेगाव यास ८९% गुण प्राप्त झाले.

❇ कुमार आदित्य गंगाधर चौधरी रा. वडझिरे यास ८८% गुण प्राप्त झाले.

❇ कुमार श्रेयस विजयकुमार ठुबे रा. कान्हूर पठार यास ८७% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी स्नेहल बाळासाहेब झावरे रा. गारगुंडी हीस ८७% गुण प्राप्त झाले.

❇ कुमार सुधीर दत्तात्रय झावरे रा. गारगुंडी यास ८७% गुण प्राप्त झाले.

❇ कुमार अनुज तुकाराम सालके रा.जवळे यास ८६% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी मधुरा जगन्नाथ शिंदे रा. हंगे हीस ८५% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी मुग्धा सुधाकर कावरे रा.सिद्धेश्वरवाडी हीस ८४% गुण प्राप्त झाले. तिला एन.सी.सी.चे ‘ए’ सर्टिफिकेट मिळाले आहे.

❇ कुमारी बोध्यांगा संपतराव केदारे रा. वडनेर हीस ८२% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी माधुरी सुभाष कारखिले रा.राळेगण थेरपाळ हीस ८२% गुण प्राप्त झाले.

❇ कुमार आशिष संतोष शिंगवी रा. पारनेर यास ८०% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी प्रियांका विश्वास काळे रा.पिंपरी जलसेन हीस ७३% गुण प्राप्त झाले.

## बारावी सायन्स

❇ कुमार संकेत चंद्रकांत मुळे रा. किन्ही यास ८०% गुण प्राप्त झाले.

❇ कुमार कुणाल संजय कदम रा.पिंपरी जलसेन यास ७७% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी शितल रावसाहेब देंडगे रा. कोहकडी हीस ७४% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी अश्विनी भाऊसाहेब भोंडवे रा.ढवळपुरी हीस ७३% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी बागेश्री रमेश कुलकर्णी रा. ढवळपुरी हीस ७०% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी निकीता नवनीत बोकरीया रा. कान्हूर पठार हीस ६९% गुण प्राप्त झाले.

## बारावी आर्टस्

❇ कुमारी सोनू बाळासाहेब जगताप रा.बाबुर्डी हीस ७३% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी रोहिणी माधव गायके रा. वासुंदे हीस ६६% गुण प्राप्त झाले.

❇ कुमारी प्रिया भागचंद तांबे रा. गोरेगाव हीस ६५% गुण प्राप्त झाले.

## बारावी कॉमर्स

❇ कुमारी मीनल विलास ठुबे रा. कान्हूर पठार हीस ७३% गुण प्राप्त झाले.


## पदवीधर

❇ कुमारी सोनाली बबनराव जाधव रा. वेसदरे ही विद्यार्थीनी बी.डी.एस. उत्तीर्ण झाली. तसेच तिचा एम.डी.एस. च्या प्रवेश परीक्षेत मेरिट लिस्टमध्ये २३ वा नंबर आला.

❇ कुमार अमोल नामदेव परांडे, रा. वडगाव दर्या यास बी.ए. भूगोल या विषयात ७८% गुण मिळाले.

❇ कुमारी रेश्मा संजीव वाबळे रा.घाणेगाव हीस बी.एड्. (इंग्लिश) मध्ये ६६% गुण मिळाले.

❇ सौ. विजया संजय औटी रा. वडझिरे ही बी.एड्. (इंग्लिश) मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली.



❇ कुमार सुश्रुत मधुकर शिरोळे रा. पाडळी दर्या हा बी.ई. कॉम्प्युटरच्या ४थ्या वर्षात असून पुणे इन्स्टिट्युट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी तर्फे कन्सेप्ट प्रोजेक्ट या अखिल भारतीय स्पर्धेत दुसरा आला.

❇ कु.सुरश्री रविंद्र कावरे रा.सिद्धेश्वरवाडी ही विद्यार्थीनी बी.आर्च. विशेष प्राविण्य श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाली.

## नांदा सौख्य भरे

❇ श्री. गवराम महादू मोरे रा. वडझिरे यांचे सुपुत्र चि. मंगेश व श्री. आबासाहेब बाबुराव सूर्यवंशी रा. श्रीगोंदा फॅक्टरी यांची सुकन्या सौ.अर्चना यांचा शुभविवाह दिनांक २३.०३.२००८ रोजी संपन्न झाला.

❇ श्री. दिनकर विठ्ठलराव घोडके रा. पारनेर यांचे सुपुत्र चि. यशवंत उर्फ बाळासाहेब व श्री. भाऊसाहेब वामन दिघे रा. धानोरे ता. राहुरी यांची सुकन्या सौ. नंदिनी उर्फ रोहिणी यांचा शुभविवाह दिनांक १८.०४.२००८ रोजी संपन्न झाला.

❇ ॲड. बबनराव संतुजी झावरे रा. टाकळी ढोकेश्वर यांचे सुपुत्र चि.डॉ.परितोष उर्फ नारायण व श्री. अशोकराव भागवतराव भोसले रा. वळदगाव ता. श्रीरामपूर यांची सुकन्या डॉ.सौ. स्वप्नाली उर्फ जानकी यांचा शुभविवाह दिनांक १९.०४.२००८ रोजी संपन्न झाला.

❇ श्री. अशोक दिनकरराव पोळ रा. जामगाव यांचे सुपुत्र जि. अभिजीत व श्री. अविनाश मुंडले रा. पुणे यांची सुकन्या सौ. स्नेहल यांचा शुभविवाह दि.२०.०४.२००८ रोजी संपन्न झाला.

❇ श्री.विश्वनाथ मारुती बांडे रा. टाकळी ढोकेश्वर यांची सुकन्या सौ. स्वाती व श्री. नामदेव रभाजी शिंदे रा. पिंपरी पठार यांचे सुपुत्र चि. गोकूळ यांचा शुभविवाह दि.२०.०४.२००८ रोजी संपन्न झाला.

❇ श्री. पंढरीनाथ काशिनाथ शेळके रा. हत्तलखिंडी यांचे सुपुत्र चि. पराग व श्री. मारुतराव कुंडलिकराव पठारे रा. वाळवणे यांची सुकन्या सौ. प्राजक्ता यांचा शुभविवाह दिनांक २८.०४.२००८ रोजी संपन्न झाला.

❇ श्री. बाजीराव झुंजारराव जगदाळे रा. बाभुळवाडे यांची सुकन्या सौ. शितल व श्री. देवीदास बाबुराव तांबे रा. ओतूर ता. जुन्नर जि. पुणे यांचे सुपुत्र चि. पराग यांचा शुभविवाह दिनांक ३०.०४.२००८ रोजी संपन्न झाला.

❇ श्री. सबाजी गणपत चौधरी रा. गारखिंडी यांचे सुपुत्र चि. अविनाश व श्री. बजरंग प्रभुजी भगत रा. चिंचोली यांची सुकन्या सौ. निर्मला यांचा शुभविवाह दि. ३०.०४.२००८ रोजी संपन्न झाला.

❇ श्री. भारत महादू गोसावी रा.पिंपरी जलसेन यांचे सुपुत्र चि. प्रशांत व श्री. आनंद गोसावी रा. नारायणगाव यांची सुकन्या सौ. उज्वला उर्फ साक्षी यांचा शुभविवाह दि. १४.०५.२००८ रोजी संपन्न झाला.


## अभिनंदन



❇ ॲड. विकास सुरेश पोटघन रा. जातेगाव यांनी एल.एल.एम. पूर्ण केले असून ते Bar at Law (बॅरिस्टर) ही पदवी मिळविण्यासाठी **लंडन** येथे गेले आहेत.



❇ श्री. विठ्ठल मारुती पठारे रा. राळेगण सिद्धी यांनी हॉटेल मॅनेजमेंटची पदवी घेतली असून पुढील शिक्षणासाठी ते **लंडन** येथे गेले आहेत.



❇ श्री. तारकराम सिताराम झावरे रा. टाकळी ढोकेश्वर यांची अहमदनगर येथून विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय पुणे येथे **कृषी अधिकारी** (प्रशासन) म्हणून पदोन्नती झाली.



❇ प्रा. बाळासाहेब भागाजी वाफारे रा. कर्जुले हरेश्वर यांची एम.आय.टी. आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज आळंदी (देवाची) येथे **प्राचार्य** पदी नेमणूक झाली.

❇ श्री. विनायक सोन्याबापू पोटघन रा.जातेगाव यांची आय.सी.आय.सी.आय. बँकेत **रिजीनल सेल्स मॅनेजर** या पदावर पदोन्नती झाली.

❇ ॲड. दादाभाऊ बबनराव शेटे रा. वडझिरे यांची भारत सरकारतर्फे **नोटरी** म्हणून नियुक्ती झाली.

❇ सुरेश काशिनाथ देशमुख रा. टाकळी ढोकेश्वर यांना **उपसंचालक (कृषी)** म्हणून पदोन्नती मिळाली असून त्यांची बदली कृषी आयुक्तालय, पुणे येथे झाली.

❇ कु. अभिजीत आप्पासाहेब बोरुडे रा. पिंपरी जलसेन हा बी.ई.कॉम्प्युटर असून त्याने **अमेरिकेतील** इंडियाना विद्यापीठ ब्लूमिंग्टन येथे **एम.एस.** केले.

## विद्यार्थ्यांसाठी निवेदन


अंजना मेडीकल अँड सोशल फौंडेशन पुणे व पारनेर तालुका मित्र मंडळ पुणे यांच्या संयुक्त सहकार्याने पारनेर तालुक्यातील गरीब होतकरु विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रम ऑगस्ट २००८ च्या शेवटच्या आठवड्यात पारनेर येथे आयोजित करणार आहोत. विद्यार्थ्यांची नावे कळविण्यासाठी सर्व शाळांनी सहकार्य करावे ही अपेक्षा !

**विश्वनाथ कोरडे**
अध्यक्ष, अंजना मेडीकल अँड सोशल फौंडेशन, पुणे.

**हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे.

## भावपूर्ण निरोप


- श्री. वसंतराव रंगनाथ हांडे रा. जवळे हे भैरवनाथ विद्या मंदिर, पाबळ ता. शिरुर जि.पुणे या विद्यालयाच्या **प्राचार्य** पदावरून दि. ३०.०४.२००८ रोजी सेवानिवृत्त झाले.
- श्री. शिवाजीराव शंकरराव गावडे रा.राळेगण सिद्धी हे न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग या विद्यालयामधून **उपप्राचार्य** म्हणून दिनांक ३१.०५.२००८ रोजी सेवानिवृत्त झाले.



- श्री. रामराव नारायणराव पाटील रा.सांगवी सूर्या हे सरदार दस्तूर होशंग बॉईज हायस्कूल, पुणे कॅम्प येथून ३० वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. ३१.०५.२००८ रोजी **वरिष्ठ शिक्षक** म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांना सेवा काळात अनेक पारितोषिके प्राप्त झालेली आहेत.



- श्री. अनंत खंडुजी औटी रा. वडझिरे, हे विमाननगर, पुणे येथील आनंद विद्या निकेतन विद्यालयातून **प्राचार्य** म्हणून दि. ३१.५.२००८ रोजी सेवानिवृत्त झाले.



- **प्राचार्य** हरिभाऊ संपतराव मुळे रा. शेरी कासारी हे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सांगवी येथील बाबुरावजी घोलप विद्यालयामधून दि. ३१.०५.०८ रोजी सेवानिवृत्त झाले.
- श्री. सखाराम कोंडीबा गागरे रा. वनकुटे हे **टाटा मोटर्स** मधून दि.०१.०६.२००८ रोजी सेवानिवृत्त झाले.
- श्री. अनिल जयवंत शिंदे रा. पानोली हे **टाटा मोटर्स** कंपनीतून दि. ३०.०६.२००८ रोजी सेनानिवृत्त झाले.

## दुःखद निधन

- श्री.राणोजी रावजी काकडे रा. पळसपूर यांचे दुःखद निधन दि.१०.०२.२००८ रोजी झाले.
- श्रीमती अनुसयाबाई पाटीलबुवा खोडदे रा.किन्ही यांचे दुःखद निधन दि.२७.०२.२००८ रोजी झाले.
- श्री. चुनीलाल लखमीचंद बाफना जमाबंदी आयुक्त (सेवानिवृत्त) रा. सुपे यांचे दुखःद निधन दि.११.०३.२००८ रोजी झाले. कै. बाफना मंडळास दरवर्षी देणगी देत असत.
- श्री.लक्ष्मणराव शिवराम उंडे रा. कर्जुले हरेश्वर यांचे दुःखद निधन दि.१०.०४.२००८ रोजी झाले.
- एस.एस.सी. बोर्डाचे सहसचीव श्री. नवनाथ बळवंत खेनट रा. गोरेगाव यांचे दुःखद निधन दि.१६.०४.२००८ रोजी झाले.
- किर्ती साडी सेंटर चे मालक श्री. चंदनमलजी देवीचंदजी गांधी रा. पळशी यांचे दुःखद निधन दि.१०.०५.२००८ रोजी झाले.
- श्री. नारायण बाळाजी कोल्हे रा.लोणी हवेली यांचे दुःखद निधन दि.०८.०६.२००८ रोजी झाले.
- श्री. हरिभाऊ सोनाजी शिर्के रा. कर्जुले हरेश्वर यांचे दुःखद निधन दि.१४.०६.२००८ रोजी झाले. ते हरेश्वर नागरी पतसंस्था मुंबईचे संस्थापक अध्यक्ष, हरेश्वर ग्रामीण विकास ट्रस्ट व शिक्षण संस्था कर्जुले हरेश्वर या संस्थेचे सचिव तसेच सेनापती बापट नागरी पतसंस्था मुंबई चे संचालक होते.
- सौ. सरोजिनीबाई भानुदास गादिया रा. पारनेर यांचे दुःखद निधन दि.२८.०६.२००८ रोजी झाले. त्यांनी जैन धर्मातील पवित्र असे संथारा व्रत घेतले होते.

### पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे.

## विद्यार्थी वसतिगृह बांधकाम समिती


**इंजि. विजयकुमार ठुबे — अध्यक्ष**

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मधुकर शिरोळे | सदस्य | श्री. हौसाराम घोडके | सदस्य |
| श्री. अशोक वाबळे | सदस्य | श्री. साहेबराव मोरे | सदस्य |
| श्री. काशिनाथ गायकवाड | सदस्य | श्री. सखाराम गागरे | सदस्य |

**तज्ञ सल्लागार**

| | |
|---|---|
| श्री. संजय बागडे | आर्किटेक्ट |
| श्री. विजयकुमार खिलारी | आर.सी.सी.डिझायनर |
| इंजि.सौ.सुजाता ठुबे | सिव्हील इंजिनियर |
| इंजि. सुनील कदम | सिव्हील इंजिनियर |

# उत्साहाचा अखंड झरा - हौसाराम घोडके



शिवश्री हौसाराम घोडके

अहो आमचे हौसाराम। करतात सतत काम।।धृ।।
दिवस उगवल्यावर, फिरतात घरोघर।
कुठं राहतात पारनेरकर, घरे धुंडाळित फिरं।।१।।
घोडके पारनेरचा, असं मोठ्याने सांगणार।
लोक आग्रह करणार, चहा नको म्हणणार।।२।।
बोला कधी सभासद होता, चेक सुद्धा चालणार।
कॅश भी घेतो सांगणार, दिलदार लगेच देणार ।।३।।
काही कां कू ही करणार, पण त्यांना नाही सोडणार।
पुन्हा कधी येऊ म्हणणार, राग रोष नाही धरणार।।४।।
काम मोठं आहे सांगणार, मी दर साल देतो म्हणणार।
गाववाल्यांने दिल्याचे सांगणार, नातेवाईकांच कौतुक करणार।।५।।
वरचेवर चकरा मारणार, एक दिवस चेक मिळणार।
कॅश-चेक मिळाल्यावर, खुशीने चेहराच खुलणार।।६।।
एक-एक सदस्य करुन जमविले पन्नास लाखावर।
आम्ही वसतिगृह बांधणार, खरा अध्यक्ष शोभणार।।७।।
तालुक्याला अभिमान, आम्ही घोडक्यांचा सांगणार।
अशाच माणसांवर देव सदा कृपा करणार।।८।।
उत्साहाचा हा अखंड झरा, कधी नाही आटणार।
विनवितात पारनेरकर, घोडके दीर्घायु बनणार।।९।।

**कवी - भाऊसाहेब नरड सर (कासारे)**

## वसतिगृह बांधकामास सढळ हाताने मदत करा !

पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वसतिगृहाचे बांधकाम सुरु करीत आहोत. सदर बांधकामास निधीची आवश्यकता असल्याने व निधी संकलन वेगाने होण्याचे दृष्टीने निधी संकलन समिती स्थान करण्यात आली असून या समितीतील सदस्यांना सहकार्य करावे व प्रत्येकाने वसतिगृह बांधकामातील आपला खारीचा वाटा उचलावा ही विनंती.

### निधी संकलन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| **१)** | **बाजीराव झुंजारराव जगदाळे** | **अध्यक्ष** | **९९२२३७४२२५** |
| २) | विश्वनाथ यादवराव कोरडे | उपाध्यक्ष | ९०११०१८९०१ |
| ३) | हौसाराम विठ्ठलराव घोडके | सदस्य | ९४२०६९६७९० |
| ४) | अशोक चुनीलाल कटारिया | सदस्य | ९४२२०३६७०१ |
| ५) | अनंतराव महादेव मातेरे | सदस्य | ९८२२२४७४६३ |
| ६) | मधुकर हौशाभाऊ शिरोळे | सदस्य | ९९२२१६६१२५ |
| ७) | सखाराम कोंडीबा गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ |
| ८) | सुनिल कुंडलिक पोटे | सदस्य | ९२२६९२१०८८ |
| ९) | तारकराम सिताराम झावरे | सदस्य | ९४२३७८८९१७ |

# उद्योगप्रिय भागचंदजी कर्नावट



कै.भागचंदजी कर्नावट
जन्म १.३.१९४५
मृत्यू १.३.२००७



कमलाबाई कर्नावट

कर्नावट परिवार मुळचे खडकवाडी येथील. नुसत्या गावाच्या नावात खडक नाही तर तो परिसर सुद्धा तसाच कायम दुष्काळी. दळणवळणाची साधने नाहीत. कर्नावट कुटुंब तसे मोठे. सात भाऊ व दोन बहिणी. या आडवळणी गावात निभाव लागणे शक्य नसल्यामुळे गाव सोडणे भाग पडले. पुण्यात येऊन हालअपेष्टा सोसून सर्वच भावंडांनी शिक्षण घेऊन प्रगती केली.

श्री.भागचंदजी यांनी प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.ई.(मेक.) ही पदवी विशेष प्राविण्यासह १९६७ मध्ये मिळविली. त्यानंतर त्यांना बजाज ऑटोमध्ये नोकरी मिळाली. त्यावेळी बजाज ऑटो कंपनीचा पियॅजो अँड कंपनीमध्ये व्हेस्पा बरोबरच्या कराराची मुदत नुकतीच संपलेली होती.

बजाज ऑटोने स्वतंत्रपणे काम करण्याचे ठरविले. भागचंदजींना ही एक सुवर्णसंधीच होती. या संधीचा त्यांनी पुरेपूर फायदा घेऊन जीव ओतून काम केले. या काळात बजाजची अनेक मॉडेल्स बाजारात आली व त्यांनी गुणवत्तेच्या जोरावर बाजारपेठ काबीज केली. या सर्व मॉडेल्सच्या डिझाईन व टुलींगमध्ये त्यांनी काम केले. त्या विभागाचे ते जनरल मॅनेजर होते.

१९९५ मध्ये कायनेटिक इंजिनियरिंगमध्ये जनरल मॅनेजर म्हणून रूजू झाले व लवकरच कंपनीने त्यांना व्हाईस प्रेसिडेंट केले. कायनेटिक इंजिनियरींग कंपनीचा भीमा कोरेगाव येथील प्लँट त्यांच्या मार्गदर्शनाखाली उभा राहिला.

१९९९ मध्ये त्यांनी तीही नोकरी सोडली. त्यानंतर स्वतंत्र व्यवसाय सुरु केला. अनेक ऑटोमोबाईल कंपन्यांचे ते टेक्नीकल ॲडव्हायझर म्हणून काम पाहू लागले. नोकरी करत असताना कामानिमित्त त्यांनी युरोप, अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया व आशिया खंडातील अनेक देशामध्ये जाऊन स्वतःचे ज्ञान अद्ययावत तर केलेच परंतु त्या त्या ठिकाणी जाऊन निरनिराळ्या कंपन्यामध्ये मार्गदर्शन केले.

स्वतःचा व्यवसाय सुरु केल्यानंतर त्यांनी त्यांचे आवडीचे काम करावयाचे ठरविले ते म्हणजे विद्यार्थ्यांना या नवीन टेक्नॉलॉजीचे मार्गदर्शन करणे. त्यासाठी त्यांनी 'ग्लोबल इन्फोटेक कंपनी' स्थापन करुन त्यामध्ये कॉम्प्युटरचे ट्रेनिंग देणे सुरु केले. यामध्ये बेसिक पासून कॅड कॅम व ॲडव्हान्स्ड ट्रेनिंग दिले जाते. प्राधिकरणामध्ये ही संस्था त्यांनी नावारुपाला आणली. आजपर्यंत शेकडो विद्यार्थी या संस्थेमधून बाहेर पडून अनेक क्षेत्रामध्ये काम करतात.

त्यांनी त्यांच्या पत्नी कमलाबाई यांना कंपनीचा कारभार कसा करावा याबद्दल मार्गदर्शन करुन त्यामध्ये तयार केले. कमलाबाईंनीसुद्धा अनेक वर्षांच्या खंडानंतर सर्व काही व्यवस्थितपणे आत्मसात केले व त्यासुद्धा तितक्याच प्रभावीपणे साहेबांनी उभी केलेली कंपनी चालवतात. साहेबांचा मुलगा आशिश हा सुद्धा बी.ई.कॉम्प्युटर असून अमेरिकेमध्ये त्यांने एम.एस. केले. परंतु वडिलांच्या निधनानंतर तो फेब्रुवारी २००८ मध्ये अमेरिकेतील आठ वर्षांची नोकरी सोडून कायमचा मायदेशी परत आला व आईबरोबरच कंपनीचे काम सुरु केले.

साहेब शरिराने येथे असले तरी मनाने त्यांना कायमच गावाकडची ओढ असे. म्हणूनच त्यांनी खडकवाडीत जमीनसुद्धा घेतली. पारनेर तालुका मित्रमंडळाच्या स्थापने पासून साहेबांचा संस्थेमध्ये सक्रिय सहभाग असावयाचा. त्यांनी बजाज ऑटोमध्ये तालुक्यातील बऱ्याच मुलांना नोकरीची संधी दिली. त्याचा त्यांना काही वेळा त्रास सुद्धा झाला. साहेब कायम कामात व्यस्त असायचे.


म्हणूनच त्यांच्या पत्नी श्रीमती कमलाबाई व मुलगा चि.आशिश यांनी त्यांच्या दि.०१.०३.२००८ च्या प्रथम स्मृती दिनानिमित्त इतर कोणतेच कर्मकांड न करता पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वसतिगृहाच्या बांधकामासाठी त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वसतिगृहाच्या एका खोलीसाठी रु.६१०००/- देणगी दिली व खऱ्या अर्थाने समाजास आदर्श घालून दिला.

शब्दांकन
**हौसाराम घोडके**



कै.शांतीलालजी बोकरिया
जन्म २१.३.१९३८
मृत्यू १०.०६.१९९७

# शांतीलालजी भगवानदासजी बोकरिया आदर्श उद्योजक



श्री.सुनील बोकरिया

पारनेर तालुक्यातील कान्हूर पठार हे गाव समुद्रसपाटीपासून सर्वांत उंचीवरचे गाव. गावाच्या उंचीप्रमाणेच गाव शैक्षणिक, सामाजिक, उद्योग व राजकारणात सुद्धा उंचावरच. कान्हूर पठारचे नाव तालुक्यात यामुळेच आदराने घेतले जाते. याशिवाय हे गाव बक्षी गव्हाकरीता संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध! बक्षी गहू ही काय चीज आहे हे आजच्या हायब्रीड जमान्यात कळणार नाही. पण ज्यांनी त्याची पोळी खाल्ली त्यांच्या जिभेवर ती चव अजूनही रेंगाळत असेल.

याच गावात भगवानदासजी बोकरिया यांची शेती होती. अत्यंत सचोटीने शेती करणारे हे कुटुंब. परंतु काळाच्या ओघात शेती परवडेना म्हणून १९६० मध्ये त्यांचे पुत्र श्री.शांतीलालजी नशीब अजमावण्यासाठी गाव सोडून पुणे येथे आले. येथे येतांना अंगावरच्या कपड्याशिवाय दुसरे कोणतेच भांडवल जवळ नव्हते. पण पैशात मोजता न येणाऱ्या अनेक गोष्टी त्यांच्या खात्यात होत्या, त्या म्हणजे प्रामाणिकपणा, पडेल ते काम करण्याची तयारी व त्यासाठी अपार कष्ट करण्याची जिद्द. या जोडीस गगन भरारी घेण्याची क्षमता. येथे आल्यानंतर भगवानदासजी सोमाणी पेपरवाले यांचे दुकानात त्यांनी नोकरी सुरु केली.

उत्तम व्यवहारज्ञान व आकलन शक्तीच्या जोरावर त्यांनी पेपरच्या धंद्यातील बारकावे समजून घेतले. याच काळात त्यांचा संबंध उद्योग महर्षी बाबुरावजी पारखे यांच्याशी आला. त्यांनी या तरुणातील उद्योजकाला हेरले व त्यांना प्रोत्साहन देऊन स्वतःची पेपर कंपनी काढण्यास उद्युक्त केले. बाबुरावजींची मध्य प्रदेशामध्ये स्वतःची पेपर मील होतीच. त्यामुळे शांतीलालजींचा भांडवलाचा प्रश्न सुटला. १९७२ मध्ये त्यांनी भागिदारीमध्ये मयूर पेपर कंपनी सुरु केली. या दुकानाचे उद्‌घाटन स्वतः बाबुरावजींनी केले.

शांतीलालजींनी बाबुरावजींचा विश्वास सार्थ ठरविला. पुढे १९८० मध्ये त्यांनी पार्श्वपाथ पेपर कंपनी काढली. दोन्ही दुकाने अत्यंत उत्तम रितीने चालली. परंतु शांतीलालजींना आयुष्य फार कमी लाभले. वयाच्या ५९ व्या वर्षीच त्यांचे अकाली निधन झाले.

या कुटुंबावर आकाश कोसळले. कारण दोन्ही पुत्र तसे लहानच होते. पण त्यांच्या पत्नी श्रीमती चमकबाई यांनी हे संकट धीरोदात्तपणे पेलले व सर्व कुटुंबाची घडी व्यवस्थित बसविली. आज त्यांच्या तिन्ही मुली सौ. साधना, सौ. सुवर्णा व सौ.सिमा या त्यांच्या घरी सुखी आहेत. चि सुनील व अनिल आपापल्या व्यवसायात स्थिरावलेले आहेत.

थोरले चिरंजीव श्री. सुनील हे वडिलांचा व्यवसाय उत्तमपणे चालवितातच परंतु त्याशिवाय त्यांनी स्वतःचा बांधकाम व्यवसाय सुरु केला असून तो सुद्धा ते उत्तमरित्या करतात.

सामाजिक व पितृऋणातून उतराई होण्यासाठी त्यांनी मंडळाच्या एका खोलीसाठी रु.६१,०००/- देणगी दिली. पण एवढ्यावरच न थांबता आजोबांच्या नावावर सुद्धा देणगी देणार असल्याचे सांगितले.

शब्दांकन
**हौसाराम घोडके**

## ऋणनिर्देश !

ज्या ज्या हितचिंतक सभासद व देणगीदारांनी संस्थेस देणगी दिलेली आहे त्या सर्वांच्या प्रती मंडळ कृतज्ञ आहे. हा लोभ असाच वृद्धींगत व्हावा हीच अपेक्षा !

**- अध्यक्ष**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२००७ ते ३१.०३.२००८ अखेरचे

| जमा | रुपये | खर्च | रुपये |
|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | | बँक चार्जेस खाते | १,२२४.२६ |
| रोख | १६९.०० | वार्षिक मिटिंग व समारंभ खर्च | १३,३५३.०० |
| सुवर्णयुग सहकारी बँक | २१,१११.६० | धर्मदाय आयुक्त कर खाते | १,०५४.०० |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | ३,८५,२४७.०० | शैक्षणिक मदत | २,०००.०० |
| | | शैक्षणिक - पुस्तक वाटप | २७,२००.०० |
| | | शैक्षणिक शिबिर | ५,६००.०० |
| बचत ठेव व्याज खाते | ६,०९४.०० | गव्हर्नमेंट फी | १,७५१.०० |
| मुदत ठेव व्याज खाते | १,००,३२५.०० | कोर्ट खर्च खाते | ३,२००.०० |
| बिल्डिंग फंड खाते | १०,१३,७९९.०० | पोस्टेज खर्च | २,६००.०० |
| | | प्रवास खर्च खाते | ६,०००.०० |
| मुदत ठेव | ११,४०,०००.०० | लिहिणावळ | ५,५००.०० |
| | | ऑडिट फी | २,५००.०० |
| | | झेरॉक्स आणि टायपिंग | २,८३२.०० |
| | | **इमारत बांधकाम प्राथमिक खर्च** | |
| | | विकास शुल्क निधी | २२,७५०.०० |
| | | विना परवाना बांधकाम शुल्क | २५,११०.०० |
| | | बिल्डिंग परवानगी फी | ९००.०० |
| | | किरकोळ खर्च | १,५०७.०० |
| | | मुदत ठेव व्याज येणे | ३६४.०० |
| | | **प्रिंटिंग खर्च** | |
| | | प्रिंटिंग आणि स्टेशनरी | २,६८५.०० |
| | | त्रैमासिक छपाई खर्च | १३,५७०.०० |
| | | टि.डि.एस. | १४,७१९.०० |
| | | मुदत ठेव | १६,५५,०००.०० |
| | | **अखेरची शिल्लक** | |
| | | रोख | ७,०६८.०० |
| | | सुवर्णयुग सहकारी बँक | ७,७५,०४९.३४ |
| | | स्टेट बँक ऑफ इंडिया | ७३,२०९.०० |
| **एकूण रुपये** | **२६,६६,७४५.६०** | **एकूण रुपये** | **२६,६६,७४५.६०** |

पुणे,
दिनांक : ०७.०७.२००८

| | | | |
|---|---|---|---|
| **बाजीराव जगदाळे** | **सखाराम गागरे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२००७ ते ३१.३.२००८ अखेरचे

| **खर्च** | **रुपये** | **जमा** | **रुपये** |
|---|---|---|---|
| बँक चार्जेस खाते | १,२२४.२६ | | |
| वार्षिक मिटिंग व समारंभ खर्च | १३,३५३.०० | मुदत ठेव व्याज खाते | ६,०९४.०० |
| धर्मदाय आयुक्त कर खाते | १,०५४.०० | | |
| शैक्षणिक मदत | २,०००.०० | | |
| शैक्षणिक – पुस्तक वाटप | २७,२००.०० | बचत ठेव व्याज खाते | १,००,३२५.०० |
| शैक्षणिक शिबिर | ५,६००.०० | | |
| गव्हर्नमेंट फी | १,७५१.०० | तोटा ताळेबंदास वर्ग | ३४,९७१.९१ |
| कोर्ट खर्च खाते | ३,२००.०० | | |
| पोस्टेज खर्च | २,६००.०० | | |
| प्रवास खर्च खाते | ६,०००.०० | | |
| लिहिणावळ | ५,५००.०० | | |
| ऑडिट फी | २,५००.०० | | |
| झेरॉक्स आणि टायपिंग | २,८३२.०० | | |
| विकास शुल्क निधी | २२,७५०.०० | | |
| विना परवाना बांधकाम शुल्क | २५,११०.०० | | |
| बिल्डिंग परवानगी फी | ९००.०० | | |
| किरकोळ खर्च | १,५०७.०० | | |
| **प्रिंटिंग खर्च** | | | |
| प्रिंटिंग आणि स्टेशनरी | २,६८५.०० | | |
| त्रैमासिक छपाई खर्च | १३,५७०.०० | | |
| घसारा | ६२.६५ | | |
| **एकूण रुपये** | **१,४१,३९८.९१** | **एकूण रुपये** | **१,४१,३९८.९१** |

पुणे,
दिनांक : ०७.०७.२००८


| | | | |
|---|---|---|---|
| **बाजीराव जगदाळे** | **सखाराम गागरे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ
## ताळेबंद पत्रक ३१.०३.२००७ अखेरचे

| जमा | रुपये | रुपये | खर्च | रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| **ट्रस्ट निधी** | | | **स्थिर मालमत्ता** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ७३,२९४.०० | **लिजहोल्ड लॅण्ड** | | |
| **इतर निधी** | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | २५,०००.०० |
| **बिल्डींग फंड** | | | **बोअरवेल** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १८,५१,१३४.८६ | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९,३९६.०० |
| अधिक जमा | १०,१३,७९९.०० | २८,६४,९३३.८६ | **इमारत** | | |
| **शैक्षणिक फंड** | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ८७,२४७.८३ |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९६,७२५.०० | **जमीन खरेदी** | | |
| **अंत्यविधी जमा निधी** | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ८,४५,३११.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,३०,१२२.०० | **मुदत ठेव** | | १४,३५,०००.०० |
| **वसतीगृह डिपॉझिट** | | | **फर्निचर** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,८००.०० | मागील ताळेबंदाप्रमाणे | ६२६.४६ | |
| **उत्पन्न खर्च खाते** | | | वजा-घसारा | ६२.६५ | ५६३.८१ |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,५०,६७६.०३ | | वृक्षसंवर्धन अनामत | | ९,०००.०० |
| वजा - तोटा | ३४,९७१.९१ | १,१५,६९६.१२ | मुदत ठेव व्याज येणे | | ३६४.०० |
| | | | टि.डि.एस. | | १५,३६२.०० |
| | | | **अखेरची शिल्लक** | | |
| | | | रोख | ७,०६८.०० | |
| | | | सुवर्णयुग सह.बँक | ७,७५,०४९.३४ | |
| | | | स्टेट बँक | ७३,२०९.०० | ८,५५,३२६.३४ |
| **एकूण रुपये** | | **३२,८२,५७०.९८** | **एकूण रुपये** | | **३२,८२,५७०.९८** |

पुणे,
दिनांक : ०७.०७.२००८

**बाजीराव जगदाळे** — सेक्रेटरी
**सखाराम गागरे** — उपाध्यक्ष
**हौसाराम घोडके** — अध्यक्ष
**मे.के.बी.साळुंके अँड कं.** — लेखा परीक्षक




## -: विशेष सूचना :-

☺ कार्यक्रम वेळेवर सुरु होईल.

☺ प्रथम जागेवर भूमीपुजन होवून नंतर लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात कार्यक्रम सुरु होतील. सभासदांनी मंगल कार्यालयात थांबले तरी चालेल.

☺ **कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घ्यावा.**

☺ सिमला ऑफीस, शिवाजीनगर, पुणे येथून चिंचवडला जाणाऱ्या बसमधून डांगे चौकात उतरावे.

☺ वसतिगृहाच्या बांधकामासाठी कार्यक्रमाच्या वेळेस ज्यांना देणग्या द्यावयाच्या आहेत त्यांनी मंडळाशी संपर्क साधावा.

☺ सर्वांनी उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ढुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री.सुनील तोटे यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ३९५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून ए-१/१ यशोधन सोसायटी, चिंतामणीनगर भाग-२, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ______________________

______________________

______________________

______________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.- ९४२०६९६७९०